**Vidyashilp Education Trust's**

**VISTARA WORLD SCHOOL**

**Exam : PT-1 (AY-2024-2025)**

**Grade : VIII**

**Subject : Science** **Max Marks : 40**

**Date :** **Time : 90 Min**

---

**Q.1 Tick the correct ans..**

(i) When healthy seeds are dipped in water , seeds_____

(a) Sink in water (b) Float in water (c)Neither sink nor float
(d) All of these

(ii) Identify the weedicide -

(a)Urea (b) 2,4D (c) NPK (d) BHC

(iii) Soyabean is a very healthy food for our health. It is sown in rainy season in India. Which crop is this-

(a) Rabi (b) kharif (c) both (a)(b) (d)None of these

(iv) Which of the following microbe is involved in curd formation?

a) Rhizobium (b) Lactobacillus (c) Fungi (d) Virus

(v) Microorganism not only cause diseases in human and plant's but also in other animals. There is one human and cattle disease caused by a bacterium. That is-

(a) Anthrax (b) Cholera (c) Malaria (d) Polio

(vi) The milk is heated to about 70 degree for 15 to 30 seconds and then suddenly chilled and stored. Which Process is this -

(a) Nitrogen Fixation (b) Pasteurisation (c) Fermentation (d) All of these

(vii) Name the petroleum product is used for surfacing of roads-

(a) Coal gas (b) Coke (c) Bitumen (d) Coal

(viii) Petroleum was formed from prganisms-

(a) Living on the land (b) Living on the plants

(c) Living in the sea (d) None of these

(ix) A toy car released with the same initial speed will travel farthest on _____ surface.
(a) Muddy (b) Polished marble surface (c) Cemented surface
(d) Brick surface

(x) Assertion (A): Airplanes have special shape that resembles with birds.
Reason (R): Scientists take inspiration from nature to design airplanes so as to reduce friction experienced by air.

(a) Both assertion (A) and reason (R) are true and reason (R) is the correct explanation of assertion (A).
(b) Both assertion (A) and reason (R) are true but reason (R) is not the correct explanation of assertion (A)
(c) Assertion (A) is true but reason (R) is false.
(d) Assertion (A) is false but reason (R) is true.

**Q.2 Very short answer-**

(i) Why does not milk in packet get spoiled?

(ii) How do you prevent communicable diseases ?

(iii) Write two uses of coal?

(iv) What is know as " Black Gold" and why?

(v) Why is it difficult to walk on wet marble floor?

**Q.3 Short answer-**

(i) Give two examples for each of the following-

(a) Kharif crops

(b) Rabi crops

(c) Fertilisers

(ii)Explain Nitrogen cycle with outline diagram.

(iii) Why should we always cover our mouth while sneezing?

(iv) Give two uses of natural gas ?

**Q.4 Long answer-**

(i) Give examples to show that friction is both a friend and a foe ?

(ii) Describe the Ways of increasing friction.

**Q.5 Case base -**

(i) In your class 35 students are there. Marry has chicken pox. How marry will take precaution?

(ii) Rajesh has to push lighter box and Rajesh has to push a similar heavier box on the same floor, who will have to apply a larger force and why?

(iii) The farmer prepared the soil in his field by turning and the loosening the soil . How does turning and loosening the soil help in growing plants?

(iv) Plants and animals are continuously using nitrogen. Will there be a depletion of Nitrogen in the environment due to this continuous use? Explain your answer.

(v) Which of these statementsis true about coal?
Tick 'yes' or 'no' for the correct answer

(a) Dirt makes up a large part of coal. Yes/No
(b) Coal is produced from plant fossils. Yes/No
(c) Formation of coal requires heat and pressure. Yes/No

(vi) Why the weightlifters appply chalk powder on their palms while lifting weights?

(vi) If we spill a bucket of soapy water on marble floor accidently. Would it make it easier or more difficult for you to walk on the floor? Why?

(vii) Arrange them in proper order to make a flow chart of sugarcane crop production-

1. Sending crops to sugar-factory

2.Irrigation

3. Harvesting

4. Sowing

5. Preparation of soil

6. Ploughing the field

7. Manuring

(viii) We eat Lactobacillus along with curd!Is it not harmful for us?

(ix) In today's world, electric vehicles (EV's) are becoming popular . When you compare EVs to regular cars that run on Diesel or petrol , how can you figure out which one is better choice, taking into account factors such as their cost , how far they can travel and their impact on the environment?

**विद्याशिल्प शिक्षण मंडळ**

# विस्तारा वर्ल्ड स्कूल

**उजळणी कार्यपत्रक (Revision Worksheet)**

**विषय - मराठी**

**इयत्ता - ८ वी**

---

## विभाग 'अ' - वाचन व आकलन

**प्रश्न १) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

टिक ! टिक ! टिक ! घडयाळ सतत सुरू राहते. घडयाळ आपल्याला सांगते की, सतत वेळेनुसार कार्य करीत राहा. वेळ खूप वेगवान असतो. वेळेला कोणीही थांबवू शकत नाही. एक एक क्षण फार महत्त्वाचा आणि मोलाचा असतो. गेलेला एक क्षण परत येत नाही.

सूर्य रोज वेळेतच उगवतो आणि वेळेतच मावळतो. घडयाळ आणि सूर्य आपल्याला दररोज शिस्तीचा धडा शिकवतात. निरंतर कार्यरत राहणे हेच जीवन आहे. प्रत्येक काम वेळेवरच केले पाहिजे. जो मनुष्य वेळेनुसार काम करीत नाही, तो कधीच प्रगती करू शकत नाही.

एकदा एक माणूस गांधीजींजवळ गेला. त्याने गांधीजींना प्रश्न विचारला, "महात्माजी, जीवनात प्रगती करण्यासाठी मानवाने सर्वात प्रथम काय प्राप्त केले पाहिजे, शिक्षण, शक्ती की संपत्ती ?" गांधीजी म्हणाले, "या संपूर्ण जीवनात प्रगती करण्यासाठी मेहनतीची गरज आहे, परंतु माझ्या मते सर्वात जास्त गरज आहे 'वेळेचे भान ठेवणे !' सर्व कार्यांसाठी निश्चित वेळ असते. जर आपण त्या वेळेनुसार कार्य केले तर निश्चितच यश प्राप्त करता येते."

मुलांनो वेळ तर जीवनात यशस्वीतेच्या किल्लीसारखी आहे. वेळेनुसार काम करणाऱ्या व्यक्तीलाच गोड फळ मिळू शकते.

**प्रश्न १) अ) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा.**

१) आपल्याला शिस्तीचे धडे कोण शिकवते ?

अ) घडयाळ   ब) सूर्य   क) क्षण   ड) पर्याय 'अ' व 'ब' बरोबर

२) वेळेनुसार कार्य केले तर आपण काय प्राप्त करू शकतो ?

अ) नंबर   ब) यश   क) अपयश   ड) पराजय

**आ) खालील प्रश्नांची उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) गांधीजींच्या मते प्रगती कोणाची होऊ शकत नाही ?

२) घडयाळ आपल्याला काय शिकवते ?

**इ) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) 'वेळेचे महत्त्व' तुमच्या शब्दांत लिहा.

२) वेळेनुसार काम केले नाही तर काय होईल ?

**प्रश्न २) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

घर नाही चार भिंती
घर असते देखण्या कृती,
घर नाही एक वस्तू
घर म्हणजे आनंदी वास्तू
घर नाही नुसत्या खोल्या
घरात हव्या भावना ओल्या
घरात हवा जिव्हाळा
घर शिक्षणाची पहिली शाळा

घर शिकवते पाहायला,
चालायला, धावायला,
घर शिकवते लढायला
दु:खाचा डोंगर चढायला
घरात आईचे अपार कष्ट
आजी सांगते सुंदर गोष्ट
घरात आजोबा गप्पिष्ट
आईच्या हातचे जेवण चविष्ट

**प्रश्न २ अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा.**

१) माणसाची पहिली शाळा कुठे सुरू होते ?

अ) शाळेमध्ये ब) समाजामध्ये क) घरामध्ये ड) डोंगरात

२) आईच्या हातचे जेवण कसे असते ?

अ) गोड ब) तिखट क) बेचव ड) चविष्ट

३) घर ही कशी वास्तू असते ?

अ) आनंदी ब) देखणी क) सुंदर ड) नुसत्या खोल्या

**आ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) घर काय काय शिकवते ?

२) घरात जास्त गप्पा कोण मारते ?

३) कवितेला योग्य शीर्षक दया व लिहा.

**विभाग ‘ब’ - व्याकरण**

**प्रश्न 3) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

१) खालीलपैकी योग्य विधाने कोणती ?

क) वाक्यात ज्या नामाबद्दल विशेषण आलेले आहे त्यास विशेष्य म्हणतात.

ख) नामबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला विशेषण म्हणतात.

अ) पर्याय ‘क’ चूक आणि ‘ख’ बरोबर ब) पर्याय ‘क' बरोबर ‘ख' चूक

क) पर्याय ‘क’ आणि ‘ख’ बरोबर ड) पर्याय ‘क’ आणि ‘ख’ दोन्ही चूक

२) ‘परिचित’ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा व लिहा.

अ) अपारंपारिक ब) अनुपयोगी क) अपरिचित ड) अपरिहार्य

३) ‘मित्र’ या शब्दाचे वचन बदला.

अ) मित्रे ब) मैत्रिणी क) मित्र ड) मित्रांना

४) ‘वैताग’ या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा व लिहा.

अ) त्रागा ब) चिडचिड क) शांत ड) पर्याय ‘अ’ व ‘ब’ बरोबर

५) ‘फायदा’ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा व लिहा.

अ) नफा ब) किफायत क) तोटा ड) लाभ

६) शाळेच्या समोर भव्य पटांगण आहे. (या वाक्यातील विशेष्य ओळखा व लिहा.)

अ) शाळेच्या ब) भव्य क) पटांगण ड) समोर

७) मुलांनो रांगेत चला. (वाक्यप्रकार ओळखा.)

८) हिमालय उंच पर्वत आहे. (या वाक्यातील विशेष्य ओळखा व लिहा.)

अ) हिमालय ब) उंच क) पर्वत ड) आहे

९) होळीला पर्यावरणाची काळजी _______. (घेणे)

(कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरुन वाक्य पुन्हा लिहा.)

१०) तुला यायला उशीर का झाला ? (वाक्यप्रकार ओळखा.)

११) खालील दिलेल्या शब्दातून विशेषण ओळखा व लिहा.

अ) डोंगर ब) सुंदर क) निसर्ग ड) पर्वत

१२) 'दगड' या शब्दाचे लिंग ओळखा व लिहा.

अ) पुल्लिंग ब) स्त्रीलिंग क) नपुसकलिंग

१३) 'आनंद' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा व लिहा.

अ) हर्ष ब) दु:ख क) खेद ड) खेद

१४) 'खडक' या शब्दाचे लिंग ओळखा व लिहा.

अ) पुल्लिंग ब) स्त्रीलिंग क) नपुसकलिंग

१५) खालील पर्यायातील नाम व विशेषण यांची योग्य जोडी ओळखा.

अ) पिवळा आंबा ब) पुस्तक-वही क) उंच-झाड ड) पर्याय 'अ' व 'क' बरोबर

१६) 'मडके' या शब्दाचे वचन बदला.

अ) मडके ब) मडकी क) मडका ड) माठ

१७) राज पुस्तक वाचत आहे. (वाक्यप्रकार ओळखा.)

१८) समिराने रांगोळीमध्ये खूप छान रंग भरले होते. (अधोरेखित शब्दाचे लिंग ओळखा व लिहा.)

अ) पुल्लिंग ब) स्त्रीलिंग क) नपुसकलिंग

१९) 'मुलगा' या शब्दाचे लिंग बदला व लिहा.

अ) मुले ब) मुलगी क) विद्यार्थी ड) मुलगा

२०) बापरे ! केवढा मोठा साप. (वाक्यप्रकार ओळखा.)

## विभाग 'क' - पाठ्यपुस्तक आधारित

**प्रश्न ५) अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बांबूच्या कोवळ्या काडीपासून काय तयार व्हायचा ?

२) जिव्हताई गप्प का होती ?

३) लेखक व त्यांच्या मित्रांचा मूर्ती बनवण्याचा उद्योग कुठे चालायचा ?

४) नदीच्या काठावरच्या खडकांची वैशिष्ट्ये लिहा.

५) कोणत्या महिन्यातले ऊन करपवून टाकणारे असायचे ?

६) पोटोबा अधूनमधून का गुरगुरतो ?

७) महादू आपला माल कशावर लादून आणायचा ?

८) पोटोबाविरुद्ध संप करायचा असे जिव्हाताई का म्हणाली ?

९) लालभडक मातीपासून काय तयार केल्या जायच्या ?

१०) लहानपणी पेन्सिल सांभाळून वापरावी का लागायची ?

**आ) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.**

१) लालभडक मऊशार माती हाताला ________ लागायची. माणसाच्या सौंदर्यात ________ भर घालतात.

अ) चिखलासारखी ब) पावडरसारखी क) लोण्यासारखी ड) मातीसारखी

२) महादू आपला माल _________ लादून आणायचा.

अ) गाढवावर ब) बैलावर क) घोड्यावर ड) सायकलवर

३) माणसाच्या सौंदर्यात ________ भर घालतात.

अ) हस्त ब) नासिका क) नयन ड) कर्ण

४) ________ मिळाला नाही म्हणून सगळ्यांचे चेहरे सुकले होते.

अ) चहा ब) खाद्यपदार्थ क) जीवनरस ड) सरबत

५) शेंदरी नावाच्या वनस्पतीतल्या बिया ________ रंग देतात.

अ) पिवळा ब) भगवा क) लाल ड) निळा

६) माणसाच्या जीवनव्यवहारात ________ मदत करते.

अ) हस्त ब) नासिका क) नयन ड) कर्णिका

७) काठालगत खूप _________ होते.

अ) शिंपले ब) खडक क) गारगोटी ड) वाळू

८) काटेसावरीच्या फुलातील परागकणांपासून _________ रंग बनवला जायचा.

अ) पिवळा ब) भगवा क) जांभळा ड) निळा

९) आपण सारे शरीररूपी राज्याचे _________ आहोत.

अ) मालक ब) सेवक क) मुले ड) मुली

१०) माझं _________ शिक्षण एका लहानशा खेड्यात झालं.

अ) माध्यमिक ब) प्राथमिक क) पूर्वप्राथमिक ड) कॉलेजचे

**इ) खालीलपैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर ४० ते ५० शब्दांत लिहा.**

१) चित्र काढण्यामध्ये लेखक व त्यांचे मित्र यांना कोणत्या अडचणी आल्या ?

२) 'आपण सगळे शरीररूपी राज्याचे सेवक आहोत.' या विधानाबाबत तुमचे मत लिहा.

३) 'तुमच्या इच्छा तीव्र असतील तर साधनांशिवाय साधना करता येते' या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

४) खडकावर काढलेल्या चित्रांना रंग देण्यासाठी लेखकाने कोणकोणत्या गोष्टींचा वापर केला ?

५) तुमचा आवडता छंद कोणता आहे ? तो जोपासण्यासाठी तुम्ही काय कराल ?

**ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा.**

(खूप आनंद होणे, अन्न मिळवण्यासाठी कष्ट करणे, कामात मग्न असणे, प्रचंड भीती वाटणे)

१) पुष्कळ लोकांना पोटासाठी वणवण फिरावे लागते.

२) शेतात मोठा साप पाहून माझ्या अंगावर काटा आला.

३) लेखक व त्यांचे मित्र खडकांवर चित्र काढताना आपली तहानभूक हरपून गेले होते.

४) राजचा बारावीच्या बोर्डपरीक्षेत पहिला नंबर आल्याने घरातील सर्वांचे आभाळ आनंदाने भरले होते.

**प्रश्न ६) अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) कवीने वर्णिलेली प्रतिभेची प्रभात कुठे होणार आहे ?

२) विद्येसोबत गुरूकडून कोणते गुण घ्यावेत ?

३) पसरणारा सुवास कशाचा आहे ?

४) कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील ?

५) सुंदर जग कोणाचे आहे ?

६) कवीच्या मते कोणाची शिकवण अमूल्य आहे ?

७) 'आम्ही चालवू हा पुढे वारसा' या गीतातून कवीने कोणते आश्वासन दिले आहे ?

८) गुरुकृपेने कोणता ध्यास मनी लागावा असे कवीला वाटते ?

९) गुरु कोणासमान आहेत ?

१०) तुम्ही वडील आहात, भाऊ आहात, सोबती आहात, तुम्ही प्रत्यक्ष आमुचि माता आहात' या अर्थाची कवितेतील ओळ शोधा व लिहा.

**आ) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.**

१) गुरूंनी दिला ________ वसा

अ) ज्ञानरूपी  ब) अभ्यासाचा  क) खेळण्याचा  ड) चित्र काढण्याचा

२) मिटवून सारे भेद चला रे _________ युगात

अ) कलेच्या  ब) स्पर्धेच्या  क) तंत्रज्ञानाच्या  ड) मानवतेच्या

३) जिथे काल __________ बीजातले

अ) अंकुर  ब) कोंब  क) रोपटे  ड) झाड

४) तुझी ________ राहील दाही दिशा

अ) अपकीर्ति  ब) कीर्ति  क) निंदा  ड) स्तुती

५) फलद्रुप हा _______ व्हावा

अ) झाड  ब) वृक्ष  क) तरु  ड) हेतू

६) हे _________ तेज पसरले नव्या युगाच्या नभात

अ) ज्ञानाचे  ब) हास्याचे  क) तारुण्याचे  ड) प्रकाशाचे

७) गुणी _________ करू पालन

अ) सज्जनांचे  ब) दुर्गुणांचे  क) विचारांचे  ड) लोकांचे

८) कलागुणांच्या क्षितिजावरती ही __________ प्रभात

अ) प्रतिभेची  ब) विकासाची  क) उन्नतीची  ड) नवनिर्माणाची

**इ) खालील प्रश्नांची ४०-५० शब्दांत उत्तरे लिहा.**

१) तुम्हाला कळलेली कवीची प्रगतीची परिभाषा स्पष्ट करा.

२) खालील कवितेच्या ओळींचा अर्थ लिहा.

१) जिथे काल अंकुर बीजातले
तिथे आज वेलीवरी ही फुले
फलद्रुप हा वृक्ष व्हावा जसा

३) सदृढ शरीर बनवण्यासाठी व्यायाम, सवयी, आहार या मुद्द्यांना अनुसरून माहिती लिहा.

४) 'आम्ही चालवू हा पुढे वारसा' या गीतातून दुष्ट लोकांशी व सज्जन लोकांशी कसे वागावे ते लिहा.

५) 'तन सुदृढ' आणि 'मन विशाल' या शब्दसमूहाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

**विभाग 'ड' - लेखन**

**प्रश्न ७) अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १००-१५० शब्दांत निबंध लिहा.**

**१) झाडे लावा झाडे जगवा**

प्रस्तावना -------- निसर्गाचा समतोल ढासळला --------- मानवी जीवन व पर्यावरणावर परिणाम ------- वाढते औद्योगिकरण -------- असंतुलित विकास ------- जंगलतोड --------- उपाययोजना काळाची गरज.

**२) माझा आवडता छंद**

प्रस्तावना --------- छंद म्हणजे काय ? ----------- त्याचे महत्त्व --------- आवडता छंद -------- त्याची जोपासना ---------- संवर्धन ---------- छंदातून होणारे फायदे ---------- काही उदाहरणे ---------- छंदाविषयी विचार ------------- समारोप

**आ) खालील बातमी वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

दिनांक : ६ सप्टेंबर, २०२३

**शिक्षकदिन समारंभ साजरा**

मुंबई : दिनांक ५ सप्टेंबर रोजी वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षकदिन उत्साहाने साजरा केला. या दिवसाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांनी आखला होता. तो अत्यंत नेटकेपणाने पार पाडला.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने शाळेचे संपूर्ण कामकाज त्या दिवशी विद्यार्थ्यांनी सांभाळले. शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांचे पाठ घेतले. वर्गातील विद्यार्थ्यांनी त्यांना उत्तम सहकार्य दिले.

मधल्या सुट्टी नंतर शाळेच्या सभागृहात समारंभ आयोजित करण्यात आला. विद्यार्थी प्रतिनिधी कुमार गोकर्ण याने भावपूर्ण भाषण केले, तर कुमारी वंदना सुर्वे हिने सुश्राव्य काव्यगायन केले.

श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. अल्पोपाहाराने या गोड कार्यक्रमाची सांगता झाली.

१) कार्यक्रमाचे नाव काय होते ?

२) दिवसभर शाळेचे कामकाज कोणी सांभाळले

३) गुरुजनांना सत्काराच्या वेळी कोणकोणत्या वस्तू दिल्या गेल्या ?